संजय गांधी निराधार अनुदान योजना व वृध्द भूमिहीन शेतमजूरांना अर्थसहाय्य योजना जिल्हा आस्थापना वेतन व वेतनेतर खर्चासाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल ते डिसेंबर, २०१८ करिता अनुदानाचे वाटप.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक: बीयुडी -२०१८/प्र.क्र. ५९/विसयो
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १८ एप्रिल, २०१८.

वाचा :-

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, क्र. विसयो २०१०/प्र.क्र.१७५/विसयो २, दि. २६ ऑक्टोबर २०१०.
२. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २ एप्रिल, २०१८.
३. शासन ज्ञापन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक बीजीटी २०१८/प्र.क्र.५४/ अर्थसंकल्प, दिनांक १६ एप्रिल, २०१८.

शासन निर्णय :-

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता संजय गांधी निराधार अनुदान योजना जिल्हा आस्थापनेसाठी रुपये ६८,१२,४३,०००/- व वृध्द भूमिहीन शेतमजूरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापना खर्च जिल्हा आस्थापनेच्या वेतन व इतर प्रशासकीय खर्चासाठी रु.२५,५६,३४,०००/- एवढी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर झालेली आहे. वित्त विभागाचे संदर्भ क्रमांक २ येथील शासन परिपत्रकान्वये माहे एप्रिल, २०१८ ते डिसेंबर, २०१८ या कालावधीच्या खर्चासाठी एकूण तरतूदीच्या ७० टक्के म्हणजेच संजय गांधी निराधार अनुदान योजना जिल्हा आस्थापनेसाठी रुपये ४७,६८,७०,१००/- (रुपये सत्तेचाळीस कोटी अडुसष्ठ लक्ष सत्तर हजार शंभर फक्त) व वृध्द भूमिहीन शेतमजूरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापना खर्च जिल्हा आस्थापनेच्या वेतन व इतर प्रशासकीय खर्चासाठी रु.१७,८९,४३,८००/- (रुपये सतरा कोटी एकोणनव्वद लक्ष त्रेचाळीस हजार आठशे फक्त) वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच मासिक विवरण पत्रानुसार निधी **एप्रिल, २०१८ ते डिसेंबर, २०१८** या कालावधी मध्ये पुढे / मागे ओढून घेण्याची सुविधा अर्थसंकल्पीय अंदाज वितरण व सनियंत्रण प्रणालीवर देण्यात आलेली आहे.

२. सर्व विभागीय आयुक्त यांना कळविण्यात येते की, त्यांनी यासोबत जोडलेल्या विवरणपत्र “अ” व “ब” प्रमाणे वितरीत केलेल्या अनुदानाचे वाटप त्यांच्या अधिपत्याखालील जिल्ह्यांना आवश्यतेनुसार करावे व जिल्हाधिका-यांना त्यांच्या जिल्ह्यातील तालुक्यांना अनुदानाचे आवश्यतेनुसार वाटप करावे.

३. सदरहू वितरीत अनुदान संजय गांधी निराधार अनुदान योजना जिल्हा आस्थापनेसाठी "मागणी क्रमांक एन-२, मुख्य लेखाशीर्ष २०५३, जिल्हा प्रशासन ०९३, जिल्हा आस्थापना (०१), सर्वसाधारण आस्थापना” या लेखाशीर्षाखाली व वृध्द भूमिहीन शेतमजूरांना अर्थसहाय्य योजना या योजनेच्या खर्चाकरीता “मागणी क्रमांक एन-२, मुख्य लेखाशीर्ष २०५३, इतर प्रशासन ०९४, (०१) इतर आस्थापना,

(०१) (०१) वृध्द भूमिहीन शेतमजूरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापना खर्च (२०५३ ११७८)" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

४. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी हा खर्च कोणत्याही परिस्थितीत त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. त्यांनी त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानातून केलेल्या खर्चाचा महालेखापालांच्या कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालून त्याप्रमाणे ताळमेळाचे विवरणपत्राची प्रत या विभागाच्या लेखा परीक्षण कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास त्वरित पाठवावीत व त्याची प्रत या विभागाच्या नियोजन कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. खर्चाच्या ताळमेळाचे काम व्यवस्थितरित्या पार न पाडल्यास, तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास विहित वेळेत सादर न केल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांवर राहील.

५. हा शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अर्थसं २०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०४१८१७४६५३४४२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.04.18 17:48:40 +05'30'

(अ.कों. अहिरे)

अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त, पुणे/कोकण/नाशिक/नागपूर/अमरावती व औरंगाबाद
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, महाराष्ट्र राज्य ,मुंबई
४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई (२ प्रती)
५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६) महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
७) वित्त विभाग, अर्थसंकल्प ३ ,४, ५ अर्थोपाय व व्यय १४, मंत्रालय, मुंबई
८) उप सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सहाय्यक संचालक (वित्त व लेखा), लेखापरिक्षण कक्ष, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवड नस्ती, विसयो.

विवरणपत्र - अ

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांक बीयुडी २०१८/प्र ५९/विसयो, दिनांक १८ एप्रिल, २०१८ सोबतचे विवरणपत्र.
मागणी क्रमांक-एन-२, मुख्यलेखाशिर्ष-२०५३, जिल्हा प्रशासन ०९३, जिल्हा आस्थापना (०१),
सर्वसाधारण आस्थापना
सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल ते डिसेंबर, २०१८ या महिन्यासांठी अनुदानाचे वितरण

(रुपये हजारात)

अ.क्र.	विभागीय आयुक्त	संगणक सांकेतांक	०१-वेतन	०६-दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क	देशांतर्गत ११ प्रवास खर्च	१३ कार्यालयीन खर्च	एकूण
१	पुणे	(०१) (०१) (२०५३ १११३)	७५७०९.९	२४५.०	६३९.१	१९९०.१	७८५८४.१
२	कोकण	(०१) (०२) (२०५३ ११२२)	७९९७१.५	४७८.८	१०९४.८	२०४१.९	८३५८७.०
३	नाशिक	(०१) (०३) (२०५३ ११३१)	८४१६१.०	५०४.०	११५१.५	२१४९.०	८७९६५.५
४	नागपूर	(०१) (०४) (२०५३ ११४२)	७६१९५.७	६१३.२	१४०१.४	२६१४.५	८०८२४.८
५	अमरावती	(०१) (०५) (२०५३ ११५१)	७९९४०.०	४३६.८	१२६३.५	१३८८.८	८३०२९.१
६	औरंगाबाद	(०१) (०६) (२०५३ ११६९)	५७३५८.०	७३०.८	१६७०.९	३११९.९	६२८७९.६
	एकूण		४५३३३६.१	३००८.६	७२२१.२	१३३०४.२	४७६८७०.१

विवरणपत्र - ब

मागणी क्रमांक एन-२, मुख्यलेखाशिर्ष-२०५३, जिल्हा प्रशासन, ०९४ इतर आस्थापना (०१)(०१) वृध्द भूमिहीन शेतमजूरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापना खर्च (२०५३ ११७८)

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल ते डिसेंबर, २०१८ या महिन्यासांठी अनुदानाचे वाटप.

(रुपये हजारात)

अ.क्र.	विभागीय आयुक्त	०१-वेतन	०६-दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क	देशांतर्गत ११ प्रवास खर्च	१३ कार्यालयीन खर्च	एकूण
१	पुणे	२९५१८	१४.१	९१.८	२००	२९८२३.९
२	कोकण	२९५१८	१४.२	९२	२०१	२९८२५.२
३	नाशिक	२९५१८	१४.१	९१	२००	२९८२३.१
४	नागपूर	२९५१८	१४.१	९२	२००	२९८२४.१
५	अमरावती	२९५१८	१४.१	९१	२०१	२९८२४.१
६	औरंगाबाद	२९५१७.७	१४.१	९१	२००.६	२९८२३.४
	एकूण	**१७७१०७.७**	**८४.७**	**५४८.८**	**१२०२.६**	**१७८९४३.८**